मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील
माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र. रामाआ-तक्रार क्र. १३/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्री. प्रशांत मधुकर चव्हाण — तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
मिरज, तहसिल कार्यालय मिरज, ता. मिरज, जि. सांगली — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
मिरज, तहसिल कार्यालय मिरज, ता. मिरज, जि. सांगली

## सुनावणी दिनांक :- १६/०९/२०२१

तक्रारदार यांनी दि. १०/०३/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार सुनावणीस तक्रारदार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी असे कथन केले की, “माझा तक्रार अर्ज दि. १०/०३/२०१७ रोजीचा असून त्यामध्ये माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्जावर कोणतीही कारवाई होत नसल्याने संबंधितांची चौकशी होऊन प्रशासकीय कारवाई होणेबाबत अशी तक्रार केलेली आहे. तसेच पुरामध्ये माझे सर्व पेपर्स खराब झाले असल्यामुळे माझ्याकडे पुरेसे कागदपत्रे नाहीत. माझ्या अर्जामध्ये जे नमूद केलेले आहे ते म्हणणे विचारात घेऊन निर्णय देण्यात यावा.”

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की, अर्जदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिल क्र. ५८/२०१६ दि. २९/१२/२०१६ च्या आदेशां विरुध्द आयोगाकडे तक्रार केलेली आहे. अपिलीय अधिकारी यांनी सदर आदेशात अपिल अंशत: मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पंधरा दिवसात उपलब्ध माहिती पुरवावी उपलब्ध नसल्यास तसे कारणासहित लेखी कळवावे असे आदेशित केले आहे. उत्तरवादी सुनावणीस गैरहजर असल्याने सदर आदेशाची अंमलबजावणी झाली किंवा नाही हे आयोगासमोर स्पष्ट झाले नसल्यामुळे आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

## आदेश

प्रथम अपिल आदेशाची काटेकोर अमंलबजावणी करण्यात यावी या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. ९०८/२०२२/सांमाआ दिनांक - २१/५/२२

LSG-2020